# फ़िनलँड देशाची सफ़र

१७ जुलै ते ३० सप्टेंबर, २००१ च्या दरम्यान, माझे आई–बाबा फ़िनलँडमध्ये आले होते. फ़िनिश उन्हाळा कसा असतो, हे अनुभवण्यासाटी ते इथे आले होते. ह्या दरम्यान आम्ही बऱ्याच ठिकाणी फ़िरलो, विविध स्थळे व माहितीपूर्ण गोष्टी पाहिल्या, तसेच अनेक गमतीशीर किस्से पण घडले.

हे लेखन नुसतेच एक प्रवासवर्णन नसून त्यात आमच्या अविस्मरणीय आठवणी नोंदण्याचा प्रयत्न केला आहे. इथे मी आम्हाला आलेले अनुभव, आई–बाबांचा फ़िनलँडच्या ट्रीपचा अनुभव, मजेदार किस्से इत्यादी बद्दल लिहित आहे. आशा करितो की तुम्हाला आमचे हे अनुभव आवडतील आणि तुम्हाला पण काही काळ फ़िनलँडची सफ़र घडवून आणेल.

# अनुक्रमणिका


फ़िनलँड देशाची सफ़र ........ १
हेलसिंकी प्राणीसंग्राहलय ........ ४
इकेया शॉप ........ ५
नॅचरल हिस्टरी म्युझियम ........ ६
वऱ्हाड निघालयं लंडनला ........ ७
ट्राम–म्युझियम व हाकासाल्मी व्हिला ........ ८
  हाकासाल्मी व्हिला ........ ८
फ़िनिश एव्हिएशन म्युझियम ........ १०
वॉर–मिलिटरी म्युझियम ........ १२
एस्पो कार म्युझियम ........ १३
इस्टोनिया देशाची सफ़र ........ १४
  ताल्लिन शहराच्या जुन्या भागातील फ़ेरफ़टका ........ १४
बोटॅनिकल गार्डन ........ १५
  शॉपिंग ........ १६
पोर्व्हो शहराची ट्रीप ........ १७
  बाहुल्यांचे म्युझियम ........ १७
  ओल्ड पोर्व्हो स्टीम फ़ेस्टिव्हल ........ १७
  बोटीतून सफ़र ........ १८
ह्युविनक्याचे रेल्वे म्युझियम ........ १९
रीहिमॅकी ट्रीप ........ २०
  ग्लास म्युझियम ........ २०
  शिकार म्युझियम ........ २०
स्टॉकहोमची ट्रीप ........ २१
  अॅक्वेरिया वॉटर म्युझियम ........ २१
  सायन्स अँड टेक्नालॉजी अँड टेलीकम्युनिकेशन म्युझियम ........ २१
स्टॉकहोमची ट्रीप (पुढे चालू ....) ........ २३
  रॉयल पॅलेस म्युझियम ........ २३
फ़ुलपाखरांचे म्युझियम ........ २४
आॅलँडची ट्रीप ........ २६
  मारीटाईम म्युझियम ........ २६

पुरातन चर्च ........................................................................ २७
श्री सत्यनारायणाची पूजा ........................................................................ २८
मजेशीर किस्से व चुटकुले ........................................................................ २९

# हेलसिंकी प्राणीसंग्राहलय

शनिवार २८ जुलै, २००१

(Helsinki Zoo - http://www.hel.fi/zoo/Enginfo.htm )

आज आम्ही येथील प्राणीसंग्राहलय बघायला गेलो होतो. मी दोन वर्षे फ़िनलँडमध्ये राहून सुध्दा आत्तापर्यंत प्राणीसंग्राहलय पाहिले नव्हते. आज आई–बाबांबरोबर प्राणीसंग्राहलय पाहताना मजा आली. फ़िनलँडमधील हे प्राणीसंग्राहलय, समुद्रातील एका छोट्या बेटावर वसवलेले आहे. ह्या बेटाचे नाव कोर्केसारी (Korkesaarl) असे आहे. कोर्केसारी बेटाच्या गेटावर तिकिट काढून, प्राणीसंग्राहलय ह्या बेटावर कसे वसवलेले आहे त्याचा एक नकाशा घेऊन, आम्ही आमची भ्रमंती सुरू केली.

येथे फ़िनलँडच्या हवामानारूप प्राणी ठेवले आहेत. तरी आम्ही जवळजवळ ४०–५० प्रकारचे प्राणी पाहिले. नेहमी असणारे प्राणी होतेच, त्याशिवाय नविन असे बरेच प्राणी आम्ही पाहिले. उदाहरणार्थ, सील मासा, बर्फ़ाळ प्रदेशात आढळणारे सफ़ेद घुबड, मिनी–साईज़ माकडे, पाठीवर दोन खुंट असलेला ऊँट (हा ऊँट मंगोलिया देशात सापडतो), चिली देशात सापडणारे फ़्लेमिंगो पक्षी (ज्याला मराठीत बहुतेक रोहीत पक्षी ह्या नावाने संबोधितात), बर्फ़ाळ प्रदेशातील शेळ्या आणि गिधाडे इत्यादी. राजहंस हा पक्षी मी आयुष्यात प्रथमच इतक्या जवळून पाहिला. खरोखरच एखाद्या राजासारखा त्याचा डामडौल होता. तसेच, फ़िनलँडची स्पेशल अशी पांढरी बदके, ह्या प्राणीसंग्राहलयाच्या बेटात ठिकठिकाणी फ़िरत होती. कोणी काय खायला देतील ह्या आशेने ती तुमच्या खूप जवळ पण येत होती.

उन्हाळा असल्याने, फ़िनलँडमध्ये तुम्हाला खूप सुंदर मोहक फ़ुले बघायला मिळतात. ह्या प्राणीसंग्राहलयाच्या बेटावर अनेक ठिकाणी गुलाबांच्या फ़ुलांचे ताफ़ेच्या ताफ़े बघायला मिळाले. एका फ़ांदीला आठ–दहा गुलाबांचे गुच्छ लागल्याने, त्याच्या वजनाने फ़ांद्या झुकलेल्या होत्या. गुलाबा–व्यतिरिक्त इतर फ़ुले पण होती. व्यवस्थित आखणी करून विविध रंगाची फ़ुले लावल्याने त्यांचे खूप सुंदर असे डिझाईन तयार झाले होते.

संध्याकाळी चार वाजल्यानंतर, आम्ही परत घरी यायला निघालो. दिवसभर खूप पायपीट केल्याने आमचे पाय लवकरच संप पुकारतील असे वाटत होते. परंतु घरी परत येण्यासाठीच्या बसेस आणि मेट्रो लगेच मिळाल्या व आम्ही लवकर घरी पोचलो. त्यामुळे पायांचा संप टळला.

# इकेया शॉप

रविवार २९ जुलै, २००१

(IKEA Shop – http://www.ikea.fi )

इकेया (IKEA) हे दुकान घरातील फ़र्निचरसाठी जगभरात प्रसिध्द आहे. जगभरात ह्या दुकानाच्या अनेक शहरामध्ये शाखा आहेत. फ़िनलँडमध्ये सुध्दा इकेयाची शाखा आहे. आज आम्ही हे इकेयाचे दुकान बघायला गेलो होतो.

ह्या दुकानात विविध प्रकारचे घरातील फ़र्निचर, सजावटीच्या वस्तु, अनेक प्रकारचे दिवे, बागबगीच्यासाठी लागणारे सामान इत्यादी गोष्टी मिळतात. फ़र्निचरच्या बाबतीत मजेशीर गोष्ट अशी की सर्व फ़र्निचर असे तयार केलेले असते की, ते आपण घरी जाऊन दिलेल्या नकाशानुसार जोडून तयार करायचे. हेच फ़र्निचर जर परत कुठे हलवायचे झाले तर परत सर्व भाग सुटे करून हलवता येतात. तसेच हे फ़र्निचर, आजकालच्या जीवनाच्या गरजा विचारात घेऊन डिझाईन केलेले असते. मोठया–मोठया शहरामध्ये राहायची जागा कमी असते. जागा कमी असली तरी त्यात सुंदर दिसेल, वापरायला सहज असेल, असे असते. ह्या दुकानात बऱ्याच ठिकाणी विविध आकाराच्या घरांचे सेट लावून ठेवले आहेत आणि त्यात त्या घराच्या आकाराला साजेल असे फ़र्निचर सजवून ठेवलेले आहे. हे असे सजवलेले घरांचे सेट पाहिले की, आपण बघणारे आपल्या घराची स्वप्ने पहायला लागतो.

हे दुकान इतके मोठ्ठे आहे की ते संपूर्ण बघायला तीन तास सहज जातात. आम्हाला सुध्दा दुकान बंद व्हायची वेळ कधी झाली ते कळलेच नाही. भारतात इकेयासारखे दुकान आले तर बऱ्याच जणांची स्वप्नातील घरे लवकरच पूर्ण होतील.

# नॅचरल हिस्टरी म्युझियम

सोमवार ३० जुलै, २००१

(Nature History Museum - http://www.fmnh.helsinki.fi/N_Default.asp )

फ़िनलँडचे राष्ट्रीय संग्रहालय पहायचे, असे आजच्या शेडयुलमध्ये होते. त्याप्रमाणे, पूर्वीच्या वास्तूरचनेप्रमाणे बांधलेल्या त्या राष्ट्रीय संग्रहालयच्या दगडी इमारती समोर जाऊन आम्ही उभे ठाकलो. परंतु, फ़िनलँडमधील बरीचशी संग्रहालये सोमवारी बंद असतात, हे आम्हाला आधी ठाऊक नव्हते. मूड–ऑफ़ झाला म्हणण्यापेक्षा पचका झाला, असे म्हणणे योग्य ठरेल.

मग आमचा मोर्चा जी संग्रहालये सोमवारी पण चालू असतात, त्यांचा शोध घेण्याकडे वळला. जवळच असे एक संग्रहालय सापडले. हे **नॅचरल हिस्टरी म्युझियम** (Nature History Museum) होते. ह्या म्युझियमची इमारत पण फ़ार जुनी होती. ह्या इमारतीचे बांधकाम १९१३ साली पूर्ण झाले होते. सुरूवातीला ह्या इमारतीमध्ये एक रशियन शाळा होती. मग नंतर तिथे म्युझियम करण्यात आले.

ह्या म्युझियममध्ये विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, अतिप्राचीन प्राण्यांचे सांगाडे, इत्यादी गोष्टी सविस्तर शास्त्रीय माहितीसकट ठेवल्या होत्या. शेवटच्या मजल्यावरच्या एका भव्य दालनात, अजस्त्र आकाराच्या डायनासोरचा सांगाडा ठेवला होता. तो पाहिल्यावर अशा अजस्त्र प्राण्यांसमोर त्याकाळी मानवाचा टिकाव कसा लागला असेल, हा प्रश्न मनात आल्याशिवाय रहात नाही. तसेच स्टीव्हन स्पीलबर्गच्या ज्युरासिक पार्क ह्या सिनेमाची आठवण पण जरूर येते.

एक दालन, विविध प्रकारचे खडक आणि स्फ़टिके ह्यांच्यासाठी राखून ठेवले होते. इथे जगाच्या विविध देशांतून, भागातून खास मागवलेली, अनेक प्रकारची दुर्मिळ स्फ़टिके आणि खडकांची लहान दगडे ठेवली होती. ह्या दालनात आम्हाला एक आश्चर्याचा धक्का बसेल, ह्याची आमच्यापैकी कुणालाही कल्पना नव्हती. ह्या दालनातील एका शोकेस मध्ये खास पुण्याहून मागवलेली स्फ़टिके होती. हे समजल्यावर आम्हांसर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला. एकंदरीत १०–१२ प्रकारची स्फ़टिके व खडक पुण्याहून मागवलेली होती. त्यांची शास्त्रीय नावे त्यांचे पुढे लिहिलेली होती. त्यापैकी काहींची नावे Stilbite आणि Apophyllite अशी होती. ही खडके मागवण्यासाठी फ़िनलँड भारताकडे कसा काय आला?, आणि तेसुध्दा थेट पुण्यापर्यंत येऊन खडके नेली?, असे अनेक प्रश्न आमच्या मनात आले. आत्तापर्यंत भारतातील बुध्दिजीवी लोकांना परदेशात खास मागणी असते असे ऐकले होते, परंतु आपल्याकडील दगडांनासुध्दा मागणी असते, हे ऐकून भारी नवल वाटले. एक गोष्ट मात्र खरी की, ह्या खडकांसमोरील **पूना, इंडिया** अशी पाटी पाहून आम्हा सर्वांना खूप आभिमान वाटला.

# वऱ्हाड निघालयं लंडनला

बुधवार १ ऑगस्ट, २००१

आई–बाबांनी इकडे येताना त्यांच्याबरोबर, अविचा मित्र चंद्रशेखर याने दिलेली, **वऱ्हाड निघालयं लंडनला**ची ऑडिओ कॅसेट आणली होती. परंतु इतके दिवस ती सापडत नव्हती. आज बॅग धुंडाळताना साईडच्या कप्प्यात ती सापडली. मग मी ऑफ़िसवरून आल्यावर सर्वजण ती कॅसेट ऐकत बसलो.

बाबा बालगंधर्व रंगमंदिरला कामाला असताना लहानपणी मी हे नाटक पाहिले होते. आज तेच नाटक ऑडिओ कॅसेटच्या माध्यमातून ऐकत होतो, तरी नाटकातले प्रसंग, प्रा. लक्ष्मणराव देशपांडयांच्या चेहऱ्यावरचे हावभाव, सर्वकाही जसेच्या तसे डोळयासमोर उभे रहात होते. पी.एच.डी केलेल्या मराठवाडयातला प्राध्यापकाने कलेच्या प्रांतात एवढे यश मिळवून दाखवणे, हे निश्चितच कौतुकास्पद होते. एवढेच नाहीतर, त्यात त्यांनी जागतिक विक्रम केला होता.

ऑडिओ कॅसेट ऐकताना खूप मजा आली, हसू आले, मूड एकदम खुलला. वेळ खूप छान गेला.

# ट्राम–म्युझियम व हाकासाल्मी व्हिला

गुरूवार २ ऑगस्ट, २००१

(Tram Museum and Hakasalmi Villa - http://www.hel.fi/kaumuseo)

दर गुरूवारी, सिटी म्युझियमशी संलग्न असलेल्या सर्व म्युझियम्सना मोफ़त प्रवेश असतो. ही संधी साधून, आम्ही आज ट्राम–म्युझियम व हाकासाल्मी व्हिला ही दोन ठिकाणे पहायला गेलो होतो.

ट्राम–म्युझियममध्ये, फ़िनलँडमधील सर्वात पहिली ट्राम व त्यानंतर आलेल्या ट्रामची विविध मॉडेल्स बघायला ठेवली होती. सर्वात पहिली ट्राम घोडयांद्वारे ओढली जायची आणि ह्या ट्रामचे मॉडेल डेनमार्कमध्ये १८८० साली बनवले गेले होते. त्यानंतर वीजेवर चालणारी ट्राम आली. ही ट्राम जर्मनीमध्ये १९०० साली बनवली गेली. तसेच, उन्हाळ्यात आणि थंडीत वेगवेगळया मॉडेलच्या ट्राम वापरल्या जायच्या. उन्हाळा असेल तर दारे–खिडक्या नसलेल्या ओपन ट्राम्स वापरल्या जायच्या. थंडी असेल तर बंदिस्त ट्राम वापरल्या जायच्या आणि थंडी वाजू नये म्हणून त्यात हिटरची सोय असायची. तसेच थंडीतल्या ट्राम्सच्या पुढे रूळावर साचलेला बर्फ़ बाजूला करण्यासाठी मोठ्ठे पाते बसवलेले असते.

म्युझियममध्ये ठिकठिकाणच्या शोकेसमध्ये त्याकाळची ट्रामची तिकिटे, ट्रामचे मासिक–पासेस, तिकिट पंच करण्यासाटी वापरला जाणारा चिमटा, कडंक्टराचा युनिफ़ॉम, तिकिटाचे पैसे जमा करण्यासाठीची बॅग इत्यादी बारीक–सारीक गोष्टी ठेवल्या होत्या.

अशाच एका जुन्या ट्राममध्ये, आतमध्ये शिरून आम्ही बघून आलो. ह्या ट्राममध्ये कंडक्टरला बसण्यासाठी स्वतंत्र सीट असायचे. ह्या सीटवर बसून कंडक्टर प्रवाशांना तिकिटे द्यायचा किंवा द्यायची. हो! "द्यायची" म्हणजे, इथे फ़ार पूर्वीपासून महिला सुध्दा कंडक्टर म्हणून काम करायच्या. ही गोष्ट, त्याकाळी सुध्दा येतील समाजामध्ये स्त्री–पुरूष समानता होती, हे दर्शविते.

पहिल्या आणि दुसऱ्या महायुध्दाच्या दरम्यान, जेव्हा ब्लॅक–आऊट (Black-Out) व्हायचे तेंव्हा ट्राम्स त्यांचे दिवे न लावता चालयच्या आणि बरीच लोकं ट्राम वापरत होती, त्यामुळे ट्राम्सला खूप गर्दी असायची. ह्या ट्राम्स युध्दप्रसंगी नागरिकांसाठी पोस्टाचे पार्सल ने–आण करायचे, पण काम करायच्या.

## हाकासाल्मी व्हिला

त्यानंतर आम्ही हाकासाल्मी व्हिला पहायला गेलो. हाकासाल्मी व्हिला हे पूर्वीच्या एका गर्भश्रीमंत माणसाचे घर होते. ह्या प्रशस्त घरात आता फ़िनिश सरकारने म्युझियम केले आहे. जुन्या काळातील रोजच्या जीवनातील विविध बारीक–सारीक गोष्टी येथे ठेवल्या होत्या. पूर्वी ज्या माणसाने पी.एच.डी.(मराटीत पी.एच.डी.ला **विद्यावाचस्पती** असे म्हणतात.) केलेली असायची, त्यासाटी एक स्पेशल टोपी असायची. ह्या टोपीवर समोर एक छोटासा बिल्ला असायचा. ह्या टोपीच्या आधारे, त्याकाळातील समाजात पी.एच.डी. केलेला माणूस लगेच ओळखला जायचा.

एका खोलीमध्ये पूर्वीचे खूप सुंदर कोरीव काम केलेले फ़र्निचर ठेवले होते. त्याकाळी स्त्री–पुरूष वापरत असलेले कपडे ठेवले होते. त्याकाळातील तरूण मुले–मुली त्यांच्या खोलीत कोणत्या वस्तू संग्रही ठेवायच्या, ते पण एका खोलीत ठेवले होते. यावरून त्या मुलां–मुलींना कोणत्या गोष्टींचे वेड होते, ते समजते.

# फ़िनिश एव्हिएशन म्युझियम

शनिवार ४ ऑगस्ट, २००१

(Finnish Aviation Museum - http://www.suomenilmailumuseo.fi/en/index.html )

आज खरे एका बेटावर असलेल्या किल्ल्यावर जायचा बेत होता. परंतु, हवामानाच्या अंदाजानुसार पाऊस आणि वारे वाहणार होते. म्हणून आम्ही हा बेत रद्द करून, फ़िनिश एव्हिएशन म्युझियम पहायला जाण्याचा बेत आखला. विमानतळाच्या वाटेवरच हे म्युझियम असल्याने, विमानतळाकडे जाणारी बस घेऊन आम्ही वाटेत ह्या म्युझियमच्या ठिकाणी उतरलो.

ह्या म्युझियम मध्ये सन १७८४ पासूनची ७० पेक्षा जास्त विमाने बघायला ठेवली होती. फ़िनलँडमधील पहिले विमान सन १८९० साली बनवले गेले. १९०९ साली विमान पहिल्यांदा उडवले गेले आणि ते ७ मिनिटे उडले. नंतर १९११ साली पहिल्यांदा डेनमार्क पासून हेलसिंकी पर्यंतचा प्रवास विमानाने केला गेला. ह्या प्रवासाला दीड तास लागला. पहिली विमाने एक-सीटाची होती आणि ती बंदिस्त नव्हती. मग हळूहळू विमानाच्या मॉडेलमध्ये सुधार होत गेला. मग टू-सीटर पासून सहा-सीटर पर्यंतची विमाने बनवली गेली. परंतु ही विमाने प्रॉपेलर (म्हणजे विमानाच्या नाकाला पुढे एक मोठ्ठा पंखा असतो).

दुसऱ्या एका दालनात, अपघातात नुकसान झालेली, जळालेली विमाने आणि त्यांचे अवशेष ठेवले होते. त्यामुळे ह्या दालनात जरा जळका घाण वास येत होता. म्हणून आई आणि तन्वी, काही न पाहता लगेच ह्या दालनातून बाहेर पडून तिसऱ्या दालनात गेल्या. हे अवशेष घाण, जळके आणि नुकसान झालेले असले तरी, त्यावरून त्या अपघातांची भीषणता किती असेल, याची कल्पना येत होती.

सन १९५५-६५ च्या दरम्यान पहिले जेट विमान बनविले गेले. ह्या विमानाच्या नाकाला पुढे मोठ्ठा पंखा नव्हता. विमानच्या दोन पंखांना दोन इंजिन होते. तसेच, ह्या विमानात पहिल्यांदा **इजेक्शन सीट** (Ejection Seat) होते. **इजेक्शन सीट** असेल तर पायलट अपघाताच्या प्रसंगी, एक बटन दाबले की सीटासकट विमानाच्या बाहेर फ़ेकला जातो व मग नंतर पॅराशूटच्या आधारे तो जमिनीवर सुखरूप पोहचू शकतो. विमानाला जर आग लागली असेल आणि ते वेगाने खाली कोसळत असेल तर अशावेळी पायलट **इजेक्शन सीटच्या** आधारे स्वतःचा जीव वाचवू शकतो.

ह्या **इजेक्शन सीट** द्वारे पायलट बाहेर आकाशात जातो आणि पॅराशूटच्या आधारे जमिनीवर उतरतो. त्याच्या पाठीच्या बॅगेमद्ये जीवनावश्यक वस्तूंचे एक किट असते. ह्या किटमद्ये चाकू, खाद्यपदार्थांचे हवाबंद-डबे, विस्तवाचे सामान, छोटासा तंबू आणि बऱ्याच गोष्टी असतात. कोणी वाचवायला येईपर्यंत, मग ह्या किटमधल्या वस्तुंच्या आधारे पायलट जिवंत रहावा असा हेतू असतो.

फ़िनएअरचे (Finnair – Finnish Airline) एक भले-मोठ्ठे जुने विमान बघण्यासाठी ठेवले होते. हे विमान, आतमध्ये जाऊन पहायला परवानगी होती. मग आम्ही आत मध्ये जाऊन, विमानाच्या आतील प्रत्येक खोलीत जाऊन, ते विमान नीट पाहून आलो. पायलटची खोली पहिल्यांदा इतक्या जवळून पाहिली.

आत्तापर्यंत कुठल्या विमानाच्या अपघाताची बातमी ऐकली, की त्या बातम्यात ब्लॅकबॉक्सचा (Black Box) उलेख्ख असायचा आणि ती ब्लॅकबॉक्स सापडली तरच विमानाच्या अपघाताचे कोडे उलघडू शकते, असे सांगितले जायचे. त्यावरून ह्या ब्लॅकबॉक्सचे महत्व लक्षात यायचे. परंतु आत्तापर्यंत ही अतिमहत्वाची ब्लॅकबॉक्स बघण्याचा योग आला नाही. ह्या म्युझियममुळे हा योग आला. एका कोपऱ्यामध्ये विमानाची

ब्लॅकबॉक्स बघायला टेवली होती. नावाप्रमाणे ही ब्लॅकबॉक्स मात्र पूर्णपणे काळी नव्हती. ब्लॅकबॉक्सचे भाग सुटे करून, त्या–त्या भागाची माहिती सविस्तर लिहिली होती, त्यावरून ब्लॅकबॉक्सबद्दलची बरीच अर्थपूर्ण माहिती मिळाली.

एका ठिकाणी एक लाकडी खोके ठेवले होते. प्रथमदर्शनी ह्या लाकडी खोक्याचा काय उपयोग असावा, हे समजले नाही. मग त्याबद्दलची माहिती वाचल्यावर कळले की, पूर्वी ह्या खोक्याच्या आधारे वैमानिकांची नेत्रतपासणी केली जायची. क्रिकेटच्या स्टंप सारख्या तीन पांढऱ्या पटया होत्या. ह्या खोक्याच्या एका बाजूस असलेल्या भोकातून बघून, मधली पट्टी आपण अशाप्रकारे हलवायची की, ती बाजूच्या दोन पत्त्यांमध्ये बरोबर बसली पाहिजे. आम्ही सर्वांनी ही मधली पट्टी सरकवून, आपापले डोळे तपासले. ह्या तपासणी असे निदर्शनास आले की, मला आणि तन्वीला सुद्दा थोडा चष्म्याचा नंबर आहे.

एकंदरीत ह्या म्युझियमची भेट खूप अभ्यासपूर्ण आणि मजेशीर झाली.

# वॉर-मिलिटरी म्युझियम

रविवार, ५ ऑगस्ट, २००१

(War and Militiary Museum – http://www.luokkis.com/sotamuseo )

**सोता म्युझेओ** – म्हणजे वॉर म्युझियम बघण्यासाटी आम्ही दुपारी लवकर जेवून बाहेर पडलो. हे म्युझियम आमच्या अपेक्षेपेक्षा फ़ार मोठ्ठे होथे. येटे फ़िनलॅंडमध्ये जे युध्द झाले त्याबद्दलची सविस्तर माहिती म्युझियम ठेवली आहे.

युध्दात वापरली जाणारी विविध प्रकारची हत्यारे, अनेक देशांच्या बनावटीच्या बंदूका, तसेच त्यामध्ये वापरली जाणारी काडतुसे, विविध आकाराचे व ताकदीचे बॉम्ब – हे सर्व पहिल्यांदा जवळून पहायला मिळत होते. स्विडिश बंदूक, जर्मन बंदूक, इतालियन बंदूक, अमेरिकन बंदूक – ह्यांच्यातले बारकावे आम्ही जवळून पहात होतो. काही ठिकाणी तर मशिनगन हाताळायला ठेवल्या होत्या. त्यांच्या हॅंडल्सला हात लावून जर आपण नेम धरायला लागलो, तर मशिनगन मधून गोळ्या सुटताना कसा आवाज़ होतो, तसा आवाज़ आपोआप मागून येतो. पहिल्यांदा मी तर दचकलोच होतो, मला वाटले की माझ्या मशिनगन मधून गोळ्या सुटल्या की काय? (कारण ह्या सर्व बंदूका खऱ्या होत्या), इतका आवाज़ हुबेहूब होता.

तसेच एका ठिकाणी, युध्दप्रसंगी नागरिकांच्या निवारासाठी बनवली जाणारी घरे तयार केली होती. ब्लॅक-आऊटचा सायरन वाजला की नागरिक आपापली घरे सोडून ह्या घरांमध्ये जमायचे. म्हणजे बॉंब जरी पडले तरी नागरिक सुखरूप राहून मनुष्यहानी कमी व्हायची. अशाच एका घरांमध्ये आम्ही गेलो. आत शिरल्याबरोबर, आपोआप ब्लॅक-आऊटचा सायरनचे, विमानाचे, बॉंबचे – असे अनेक प्रकारचे आवाज़ येऊ लागले. त्यामुळे युध्दकाळात कसे वाटत असेल, हे अनुभवायला मिळाले.

फ़िनलॅंड उत्तरेच्या टोकाला स्थित असल्याने, बर्फ़ाळ हवामानामध्ये, अत्यंत कडाक्याच्या थंडीमध्ये सैनिकांना युध्द लढावे लागते. अशा प्रसंगी ते कोणता स्पेशल वेष घालायचे, वाहतुकीसाटी कोणते प्राणी वापरायचे, ह्याची सविस्तर माहिती – लेखीस्वरूपात, चित्रस्वरूपात, विविध प्रकारची मॉडेल्स, करून दिली होती. बर्फ़ाळ हवामानच्यावेळी वाहतुकीसाठी रेंडियर व कुत्री स्केटिंगच्या गाडयांना जोडून वापरले जायचे.

सन १९४१-४५ च्या दरम्यान फ़िनलॅंडमध्ये युध्द झाले होते. ह्या युध्दात अंदाजे ६८,००० मनुष्यहानी झाली तर एक लाखाच्या वर लोक अपंग झाली. दुसऱ्या महायुध्दाच्यावेळी, लंडन, मॉस्को आणि हेलसिंकी(फ़िनलॅंडची राजधानी) ही जगातील एकमेव तीन शहरे अशी होती की ज्यांच्यावर कुठल्याही परकीय देशाने आक्रमण केले नव्हते.

शेवटच्या दालनातून निघताना, जगात युध्द का होते? युध्द किती भीषण व विदारक असते, अनेक लोकांना जीव गमवावे लागतात, तर कित्येक लोकांचे जीवन उध्वस्त होते, असे अनेक प्रश्न मनात काळ्या ढगांसारखे जमलेले होते. महाभारतात कित्येक वर्षांपूर्वी हे सत्य सांगून ठेवले आहे. **वसुधैव कुटुंबकम** ही एक संकल्पनाच राहील का? ह्या विषयावर विचारां-इतकीच कृती पण तितकीच आवश्यक आहे.

# एस्पो कार म्युझियम

शनिवार ११ ऑगस्ट, २००१

(Espoo Car Museum - http://www.espoonautomuseo.com)

आज आम्ही एस्पोचे कार म्युझियम बघायला गेलो होतो. म्युझियम फ़ार दूरवर होते, दोन बस करून आम्ही गेलो. म्युझियमचा असा काही खास बस-स्टॉप नव्हता, परंतु बस ड्रायव्हरने बस म्युझियमच्या दारापाशी थांबवली आणि आम्ही उतरलो.

एका जुन्या स्टाईलचे बांधकाम केलेल्या इमारतीमध्ये दोन मजल्यावर हे म्युझियम बनवले होते. सन १९०० सालापासूनच्या विविध बनावटीच्या कार प्रदर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. १९६० ते १९७० दरम्यानच्या फ़ॅमिली कार पण तिथे होत्या. दुसऱ्या महायुध्दानंतर फ़िनलँडमध्ये इतर देशांमधून विविध बनावटीच्या कार आयात केल्या गेल्या.

१९२९ सालामधील मर्सडीज़-बेन्ज़ (Mecedez-Benz), १९५५ सालची दॉज़ कस्टम रॉयल (Dodge Custom Royal), १९५७ सालची मॉर्गन प्लस (Morgan Plus), १९६९ सालची तासाईका (Tasaika) अशा अनेक गाडया होत्या. १९१८ सालच्या फ़ोर्ड (Ford) कारची खासियत अशी होती की कारचे लायसन घेताना, तुम्ही कोणत्या मॉडेलची कार चालवणार आहात, हे खास करून नमूद करावे लागायचे. कारण ह्या फ़ोर्ड कारचे गेअर पेडलवर आधारित होते, त्यामुळे त्या कारच्या गेअरची सिस्टिम वेगळी होती.

कार बरोबरच जुन्या काळातील अनेक बनावटीच्या मोपेडस ठेवल्या होत्या. जुन्याकाळातील व्हेस्पा स्कूटर, जर्मन बनावटीची सोलिफ़र मोपेड, सायकलीमध्ये सुधार करून तयार केलेल्या मोपेडस पण होत्या.

तास-दीड तास हे मुझियम बघताना आम्ही एकप्रकारे जुन्या काळाची सफ़रच करून आलो.

# इस्टोनिया देशाची सफ़र

१३ ऑगस्ट, २००१ ते १५ ऑगस्ट, २००१

(Tallinn City – http://www.tallinn.ee/english/index.html )

## ताल्लिन शहराच्या जुन्या भागातील फ़ेरफ़टका

सोमवार, १३ ऑगस्ट, २००१

इस्टोनिया हा देश फ़िनलँडच्या दक्षिणेला स्थित असून, पूर्वी रशियाचा एक भाग होता. ताल्लिन ही इस्टोनियाची राजधानी आहे. ह्या ताल्लिनमध्ये दोन रात्र आणि तीन दिवस अशी ट्रीप आम्ही आयोजित केली होती. सोमवार दिनांक १३ ऑगस्टला दुपारी सव्वा बाराच्या बोटीने हेलसिंकीवरून ताल्लिनच्या दिशेने आम्ही आमचा प्रवास सुरू केला. आईने याआधी एवढ्या लांब पल्ल्याचा आणि मोठया बोटीने प्रवास केला नव्हता, त्यामुळे ती थोडी अस्वस्थ होती. परंतु एकदा बोटीवर गेल्यावर, बोटीतील सुखसोयी व आराम पाहून तिची अस्वस्थता कमी झाली.

मोठया लाटांमधून बोट जायला लागली की मग ती हेलकावे खायला लागते. अशावेळी जर तुम्ही बोटीच्या आतमध्ये इतर ठिकाणी चालायला लागला की, एखादा दारूडा कसा झोकांडया खात चालतो, तसे तुम्ही चालायला लागता. दारू न पिता अशाप्रकारे झोकांडया खात चालायचा अनुभव आम्ही बोटीवर घेतला, मजा आली.

हेलसिंकी ते ताल्लिन पर्यंतचा बोटीचा प्रवास सव्वा–ते–दीड तासाच आहे. दुपारी दोन वाजता ताल्लिनला आम्ही पोचलो. रेव्हल (Reval Hotels – http://www.revalhotels.com ) ह्या हॉटेलमध्ये आम्ही उतरलो होतो. आमचे हॉटेल बोटीच्या बंदरापासून खूप जवळ होते. चालत दहा मिनितांत आम्ही हॉटेलवर पोचलो. एक तासात आवरून गावात फ़ेरफ़टका मारण्यासाटी बाहेर पडलो.

ताल्लिन शहराच्या जुन्या भागातून फ़िरताना बऱ्याच जुन्या इमारती, त्यांच्यावरील कोरीव काम बघायला मिळते. पूर्वी रशियाचे राज्य असल्याने, बऱ्याच इमारतींच्या वास्तुरचनेवर रशियन संस्कृतीचा प्रभाव जाणवत होता. शहरातील जुना भाग असल्याने ठिकठिकाणी बारीक गल्ली–बोळ होते आणि ह्या गल्ली–बोळात पण छोटे–मोठे विक्रेते बसले होते. आम्ही नुसते बाजारात काय–काय विकायला आहे, ह्यावर नजर टाकत होतो, ज्याला इंग्रजीत विंडो–शॉपिंग (Window Shopping) म्हणतात. फ़िरून–फ़िरून दमल्यावर मोकळे मैदान असलेल्या एक चौकात आलो. ह्या चौकात एक जुने रशियन चर्च होते व बरेच पर्यटक त्याचे फ़ोटो काढत होते. आम्ही ह्या चौकात प्रवेश केला आणि आईच्या भारतीय वेषाने (आईने साडी नेसली होती) बऱ्याच पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले. त्यातील एका पर्यटकाने पटापट आईचे तीन–चार फ़ोटो काढले. फ़ोटोसाठी विचारले तर आम्ही कदाचित नकार देऊ ह्या भितीने त्याने आम्हाला न विचारताच फ़ोटो काढले. थोडयावेळाकरिता का होईना आईला आपण बॉलीवूडची हिरोईन झाल्याचे वाटत होते.

मग आम्ही जवळच असलेल्या महाराजा ह्या भारतीय हॉटेलमध्ये शुध्द शाकाहारी भारतीय जेवण घेतले. जेवण तर स्वादिष्ट होतेच, परंतु चालून–चालून खूप दमल्याने चांगलीच भूक लागली होती, त्यामुळे जेवणाला आणखिनच रंगत आली.

# बोटॅनिकल गार्डन

मंगळवार, १४ ऑगस्ट, २००१

(Tallinn Botanical Garden – http://www.tba.ee/TBGeng.htm )

बोटॅनिकल गार्डन हे ताल्लिन शहराच्या बाहेर स्थित होते. ह्या गार्डनकडे जाणारी बस तर आम्ही घेतली खरी, परंतु कुठल्या स्टॉपला उतरायचे हे कुठे माहिती होते. बस कंडक्टरला सुरूवातीला विचारून बघितले, पण त्याला इंग्रजी काही येत नव्हते. बसमधील इतर प्रवाशांकडे विचारून पण काही उपयोग नव्हता, कारण त्यांच्याकडे बघून त्यांना इंग्रजी येत असेल असे वाटत नव्हते. मग आम्ही बोटॅनिकल गार्डनचा पत्ता असलेले माहितीपत्रक हातात धरून खिडकीतून इकडे–तिकडे बघू लागलो. परंतु, आमची ही अडचण जवळच्या काही महिला प्रवाशांच्या लक्षात आली. मग त्यातील एक महिला आम्हाला अस्सखलित इंग्रजीत म्हणली, 'तुम्ही काळजी करू नका! तुम्हाला बोटॅनिकल गार्डनला जायचे आहे ना? मग तो स्टॉप आला की मी तुम्हाला सांगते'. तिने असे म्हटल्यावर आम्हाला जरा हायसे वाटले. बोटॅनिकल गार्डनचा स्टॉप आल्यावर, ती बाई आम्हाला तत्परतेने, ह्या स्टॉपवर उतरा, असे म्हणाली. तसेच, आईच्या शेजारची वृध्द महिला इंग्रजी येत नसले तरी हातवारे करून म्हणाली की, शहरात परतण्यासाठी रस्त्याच्या दुसऱ्या बाजूने बस धरा. इंग्रजी येत नसले तरी मदत करायची इच्छा असलेली ही वृध्द महिला आम्हाला फ़ार प्रेमळ वाटली.

बोटॅनिकल गार्डनचा परिसर फ़ारच मोठ्ठा होता. ह्या गार्डनच्या ऑफ़िसमध्ये काऊंटरवर एक मध्यवयीन महिला होती. आमचा पेहराव पाहून तिने ओळखले की हे भारतीय असणार. मग तिने आम्हाला नमस्कार करून आमचे अभिवादन केले. मग तिकिटे काढल्यावर, इंग्रजी येत नसून सुध्दा, तिने फ़ार उत्साहाने आम्हाला गार्डनची माहिती दिली, कसे कुठे जायचे, कुठून बघायला सुरूवात करायची, सगळे काही सविस्तर सांगितले. त्यानंतर बाबा तिला थॅंक्यू म्हणाले आणि भारताबद्दल काही माहिती आहे का, राज कपूर वगैरे माहिती आहे का(कारण राज कपूरचे सिनेमे रशियात खूप फ़ेमस आहेत), असे विचारले. तेंव्हा ती म्हणाली, हो! राज कपूर माहिती आहे की, त्याचे मी सिनेमे पाहिले आहेत. 'मेरा जूता है जपानी, ये पतलून इंगलिस्तानी, सर पे लाल टोपी रूसी, फ़िर भी दिल है हिंदुस्तानी', हे गाणे म्हणून दाखवले. आम्हाला फ़ार नवल वाटले.

हे बोटॅनिकल गार्डन *पिरिता* (Pirita River) नदीच्या काठी असून सन १९६१ साली निर्मिले गेले. १५५ हेक्टर क्षेत्रफ़ळाच्या जमिनीवर हे गार्डन वसविले आहे. काही झाडे अनेक छोट्या–छोट्या बंदिस्त खोल्यांमध्ये ठेवली होती, कारण त्यांना विशिष्ट हवामानाची गरज़ होती. अशाच एका बंदिस्त दालनात सत्तर वर्षांपूर्वीचे पामचे झाड होते. ते इतके वाढले होते की त्याचे खोड उचलून धरण्यासाठी, त्याच्या खोडाला केबल्स लावल्या होत्या. दुसऱ्या एका दालनात निवडुंगाच्या असंख्य व्हरायटिज़ होत्या. त्यातील काही निवडुंगांना सुंदर फ़ुले देखील आली होती.

ही बंदिस्त दालने पाहून झाल्यावर आम्ही बाहेरील आलिशान बाग बघायला निघालो. एका भागात रॉक गार्डन केले होते. त्याच्याच जवळ पूर्वीच्या राजाची गुलाबांची बाग (रोझ गार्डन) होती. असंख्य प्रकारचे, रंगांचे, जातीचे विविध गुलाब पहायला मिळाले. गुलाबाच्या इतक्या व्हरायटीज़ आम्ही कोणीच ह्याआधी पाहिल्या नव्हत्या. हे मोहक गुलाब तोडण्याचा मोह अनेकवेळा झाला, परंतु बागेमध्ये ठिकठिकाणी कामगार काम करीत होते. पण ह्या कामगारांनी खूप फ़ुललेले गुलाब तोडून एका बाजूला ठेवले होते. हे तोडून ठेवलेले गुलाब घ्यायला परवानगी होती. निवडक गुलाब घेऊन आम्ही ह्या बोटॅनिकल गार्डन मधून बाहेर पडलो.

## शॉपिंग

शेवटच्या दिवस खरेदीसाठी राखून ठेवला होता. इस्टोनियाचे चलन फ़िनलँडच्या तुलनेत स्वस्त असल्याने, फ़िनलँडपेक्षा इथे काही वस्तु स्वस्त होत्या. आम्ही मग इस्टोनियन लोकर, कापडे व इतर बारीक-सारीक खरेदी केली. बऱ्याचशा वस्तु रशियावरून तस्करीकरून आणल्या जात असाव्यात. खरेदी करताना, घासाघीस करताना भाषेची अडचण आली. बहुतांशी लोकं रशियन बोलत होती. मग आम्ही त्यांच्याशी कॅलक्युलेटरच्या साह्याने संवाद साधला. विक्रेता वस्तुची किंमत कॅलक्युलेटरमध्ये टाईप करून आम्हाला सांगायचा. आम्हाला ती वस्तु महाग वाटली आणि काही डिस्काऊंट हवा असल्यास, आम्ही आपली कमी किंमत कॅलक्युलेटरमध्ये टाईप करून त्याला दाखवायचा. आमची किंमत त्याला पटली नाही तर तो/ती मान हलवून नकार दर्शवायची. अशाप्रकारे आम्ही घासाघीस करायचो. मजा आली.

१५ ऑगस्ट, २००१ ला परतीची बोट धरून आम्ही फ़िनलँडला परतलो. १५ ऑगस्टला भारताचा स्वातंत्र्यदिन असल्याने भारताची खूप आठवण आली.

# पोर्व्हो शहराची ट्रीप

शनिवार, १८ ऑगस्ट, २००१

(Porvoo City – http://www.porvoo.fi )

पोर्व्हो हे एस्पोमधील एक जुने ऐतिहासिक गाव आहे. हेलसिंकी ते पोर्व्हो हा प्रवास बसने एक-दीड तासाचा आहे. घरातून थोडे खायचे सामान तयार करून घेतले. आमच्याबरोबर माझा मित्र अनिरूध्द बीडकर पण येणार होता. सर्वजण बसस्टँडवर जमल्यावर आम्ही मग साडे-आठची बस घेऊन पोर्व्होला गेलो. कमी तासाचा प्रवास असल्याने वेळ कसा गेला ते कळलेच नाही.

पोर्व्होला उतरल्यावर सर्वप्रथम आम्ही टूरिस्ट ऑफ़िसमध्ये गेलो आणि आज पोर्व्होमध्ये काही कार्यक्रम किंवा प्रदर्शने आहेत का, याची माहिती घेतली. मग आमची भटकंती सुरू केली.

## बाहुल्यांचे म्युझियम

(Porvoo Doll and Toy Museum – http://www.porvoo.fi/en/enmatkailijanporvoo/ennukkemuseo.html )

एका घरामध्ये एका बाईने बाहुल्यांचे म्युझियम तयार केले होते. बाहुल्या जमवणे हा तिचा लहानपणापासूनचा छंद असावा. ७०-८० वर्षापासूनच्या विविध बाहुल्या जमवलेल्या होत्या. काळानुसार बाहुल्यांच्या बनावटींमध्ये काय-काय बदल झाला, त्यांच्या कपडयांमध्ये, खेळण्यांच्या प्रकारांमध्ये कोणते बदल झाले, ते पहायला मिळाले.

लहान मुले पूर्वी विविध प्रकारांच्या गाडयांबरोबर खेळायचे. मग काळानुसार गाडयांची जागा रणगाडे, सैनिक अशा मिलिटरीच्या खेळण्यांनी घेतली. ह्याला कारण कदाचित एकूणच जगांमध्ये हिंसा वाढली हे असावे. पण ही हिंसा मुलांच्या खेळण्यांमध्ये दिसू लागली ह्याचे वाईट वाटते. तसेच, लहान मुले पैसे साठवण्यासाठी जे बॉक्स वापरत होते, त्याचे विविध प्रकार पण बघायला मिळाले.

## ओल्ड पोर्व्हो स्टीम फ़ेस्टिव्हल

(Old Porvoo Steam Festival – http://www.geocities.com/tk31168/ )

आज पोर्व्होमध्ये ओल्ड पोर्व्हो स्टीम फ़ेस्टिव्हल होता. ह्या फ़ेस्टिव्हलमध्ये वाफ़ेवर चालणारी विविध प्रकारची इंजिने ठेवली होती. वाफ़ेवर चालणारे रेल्वेचे इंजिन आपल्या सर्वांनाच माहिती आहे. परंतु, पूर्वीच्या काळी इतर प्रकारची इंजिने पण वाफ़ेच्या शक्तीवर चालवली जायची. ह्या फ़ेस्टिव्हलमध्ये अशाप्रकारची इंजिने ठेवण्यात आली होती. त्यात वाफ़ेवर चालणारी रेल्वेची इंजिने, अनेक प्रकारच्या गाडया, ट्रॅक्टर इत्यादी. एक वाफ़ेवर चालणारे मशिन असे पण होते की त्याने अनेकप्रकारच्या शिटयांचे आवाज काढता येतात. हे मशिन फ़ार मजेशीर असल्याने जो-तो ते वापरून सारखे शिटयांचे आवाज करत होता.

## बोटीतून सफ़र

पोर्व्होची निसर्गरम्य झाडी पहाण्यासाठी मग आम्ही बोटीने एक चक्कर मारायचे ठरवले. दीड तासांची ही सफ़र होती. नदीच्या किनारी वसलेली ऐतिहासिक व जुन्या बांधणीची घरे फ़ार आकर्षक दिसत होती. ह्या घरांचे आणि हिरव्यागार झाडांचे पाण्यात पडलेले प्रतिबिंब – सर्व दृश्य मोहक होते. आमच्या बोटीत फ़ार गर्दी नव्हती, त्यामुळे शांतता होती. आम्ही आणि एक जोडपे होते. वाटेत किनाऱ्यावर, मध्येच असणाऱ्या पूलांवर दिसणाऱ्या माणसांना आम्ही हात हलवून टाटा करत होतो आणि ते सुध्दा तितक्याच आनंदाने, उत्साहाने हात हलवत होते. बोटीतून सफ़र केल्यावर खूपच फ़्रेश आणि छान वाटले.

साडे पाचला बस–स्टँडवर पोचलो तर सहाची हेलसिंकीला जाणारी बस लागलेलीच होती. ती बस पकडून मग आम्ही अविस्मरणीय आठवणी बरोबर घेऊन घरी परतलो.

# ह्युविनक्याचे रेल्वे म्युझियम

रविवार, १९ ऑगस्ट, २००१

(Finnish Rail Museum - http://www.rautatie.org/en/default.asp )

ह्युविनक्या (Hyvinkää) हे गाव रेल्वे म्युझियमसाठी फ़ेमस आहे. यावेळी प्रवास रेल्वेने करायचा होता. सकाळची आठची रेल्वे पकडून पाऊण तासाच्या आत आम्ही ह्युविनक्याला गेलो. आज विशेष म्हणजे रेल्वे म्युझियमचा वार्षिक दिन होता. त्यामुळे म्युझियममध्ये बरेच कार्यक्रम आयोजित केलेले होते.

प्रथम आम्ही तिकिट काढून रेल्वे म्युझियम पहायला सुरूवात केली. हे रेल्वे म्युझियम सन १८९८ साली हेलसिंकीच्या रेल्वे स्टेशनजवळ स्थापित केले गेले होते. मग सन १९७४ साली हे म्युझियम ह्युविनक्या ह्या गावात हलविले गेले. ह्या म्युझियममध्ये रेल्वेचा इतिहास सांगणाऱ्या २०,००० पेक्षाही जास्त वस्तु प्रदर्शित करण्यात आल्या आहेत. विविध प्रकारची, परदेशी व तसेच देशी बनावटीची वाफ़ेवर चालणारी रेल्वे इंजिन्स येथे ठेवली आहेत. बरीचशी इंजिने १०० ते १५० वर्षापूर्वीची आहेत. ही इंजिने अमेरिका, जर्मनी, डेनमार्क, फ़िनलँड इत्यादी देशात बनवली गेली आहेत.

एका दालनात पूर्वीचा रशियन राजा झार (Czar) ह्याची रॉयल ट्रेन ठेवली होती. तिच्या डब्यामध्ये राजासाठी करून ठेवलेल्या सुखसोयींची कल्पना आली. एक डब्यात राजाचा आलिशान दिवाणखाना होता, ज्यात भारी फ़र्निचर, आरामदायी सोफ़ासेट होते. दुसऱ्या डब्यात राजाची बेडरूम होती. ती पण विविध सुखसोयींनी व आरामदायी गोष्टींनी सजवलेली होती. एका डब्यात राजाची लिखाणाची खोली होती. एकंदरीत राजा अख्खा महालच त्याच्या बरोबर रेल्वेवर घेऊन फ़िरायचा.

एका शेडच्या बाहेर, रेल्वेच्या दुरूस्तीसाठी वापरली जाणारी ढकलगाडी होती. ही चार चाकी ढकलगाडी रूळावर चालत असून, ती दोन माणसांच्या सहाय्याने चालवली जाऊ शकते. पाणी काढताना आपण हातपंप कसा हलवतो, तसे ह्या गाडीवरचे हँडल हलवून, ही गाडी चालवता येते. मग आम्ही सर्वांनी ही गाडी चालवून बघितली. सारखे हँडल हलवून दम लागला होता, पण फ़ार मजा आली. एक वेगळाच अनुभव आला.

आज रेल्वे म्युझियमचा वार्षिक दिन असल्याने, आलेल्या पर्यटकांना पूर्वीच्या ऐतिहासिक रेल्वे मधून मोफ़त फ़ेरी होती. आम्ही सुध्दा ह्या ऐतिहासिक रेल्वेच्या प्रवासाचा अनुभव घेण्यासाठी तिच्यातून फ़ेरी मारून आलो. रेल्वेचे इंजिन जुने होते. रेल्वेच्या डब्याची आंतरिक रचना पण आकर्षक होती. पूर्वीच्या स्टाईलचे फ़र्निचर होते, सीटस आरामदायी होत्या. रेल्वेच्या शेवटी असलेला गार्डचा डबा पण सुरेख होता. मग मी रेल्वे चालू असताना ह्या शेवटच्या गार्डच्या डब्यात गेलो. रेल्वे रूळ कसे बदलते, मागे पडलेले रूळ कसे दिसतात, हे सर्व पाहताना बालपणीच्या दिवसांची आठवण आली. बालपणीच्या तितक्याच कुतूहलाने मी हे सर्व पाहत होतो.

# रीहिमॅकी ट्रीप

रविवार, १९ आॅगस्ट, २००१

(Riihimäki – http://www.riihimaki.fi/enlish.htm )

## ग्लास म्युझियम

(The Finnish Glass Museum – http://www.riihimaki.fi/lasimus/englan.htm)

ह्युविनक्याच्या पुढचे स्टेशन रीहिमॅकी होते. रीहिमॅकी ह्या गावाची खासियत म्हणजे त्या गावातील ग्लास म्युझियम हे होते. काचेची डिझाईन्स आणि काच ह्या वस्तुचा इतिहास ह्या म्युझियम मध्ये दाखवण्यात आला होता. सन १९८१ सालापासून हे म्युझियम अस्तित्वात आहे. ४००० हजार वर्षापासूनचा काचेचा इतिहास आणि ३०० वर्षाचा फ़िनिश काच उद्योगाचा इतिहास दर्शविण्यात आला आहे.

काच–फ़ॅक्टरी कशी असते? काचेच्या वस्तु बनविण्याच्या विविध पध्दती, काचेला नानाविध आकार देण्यासाठी वापरले जाणारे साचे (moulds) ह्या सर्व गोष्टी आम्ही प्रथमच पहात होतो. काही काही वस्तु तर अशा होत्या की त्यांना आकार कसा दिला असेल, त्यात रंग कसे उतरवले असतील, असा प्रश्न मनात येत होता. काचेच्या चित्रविचित्र वस्तु तयात करणे सुध्दा एक वेगळी कला आहे, याची कल्पना आली. कुंभार जसा त्याच्या मातीच्या भांडयाना आकार देतो, तितकेच  कौशल्य काचेच्या वस्तु तयार करताना लागत असावे.

ह्या म्युझियममधून फ़िरत असताना, आपला धक्का लागून काचेच्या वस्तु पडणार नाही ना? ह्याची भिती वाटत असल्याने, आम्ही सर्वांनीच काळजीपूर्वक हे म्युझियम पाहिले.

## शिकार म्युझियम

(The Hunting Museum of Finland – http://www.kolumbus.fi/metsastysmuseo/hunting.htm)

ग्लास म्युझियमच्या जवळच हंटिंग म्युझियम होते. हंटिंग म्युझियममध्ये शिकारीच्या संदर्भातील वस्तु ठेवल्या होत्या. बंदुकांच्या विविध मॉडेल्स, प्राणी पकडण्यासाठी वापरले जाणारे अनेक प्रकारचे सापळे(), तसेच शिकारीच्या वेळी वापरली जाणारी नानाविध वाद्ये इत्यादी मजेशीर गोष्टी येथे ठेवल्या होत्या.

एका दालनात शिकार केलेले अनेक प्राणी त्यांच्यामध्ये भुस्सा भरून ठेवले होते. वाघ, सिंह, काळवीट, रेंडीयर, इतकेच काय एकशिंगी गेंडयाचे तोंड पण ह्या दालनात होते. एकशिंगी गेंडा मी प्रथमच इतक्या जवळून पाहत होतो. त्याचे एक शिंग फ़ारच धारधार होते. मला माझ्या शाळेतल्या मित्राची आठवण आली, आम्ही त्याला गेंडा म्हणून हाका मारत होतो. पण ह्या भुस्सा भरलेल्या प्राण्यांमुळे ह्या खोलीत दुर्गंधी येत होती. म्युझियमच्या मुख्य दालनात एक अजस्त्र अस्वल भुस्सा भरून ठेवले होते. अस्वल एवढे मोठ्ठे पण असू शकते, ह्यावर आमचा विश्वासच बसेना. परंतु, फ़िनलँडच्या उत्तरेला अशाप्रकारची अस्वले आढळतात.

साडेपाचची लोकल ट्रेन धरून मग आम्ही हेलसिंकीला परतलो.

# स्टॉकहोमची ट्रीप

२४ ऑगस्ट ते २७ ऑगस्ट, २००१

(Stockholm Town - http://www.stockholmtown.com)

पाच–सहा दिवसांच्या ट्रीपला जायचे म्हणून आम्ही दोन–तीन दिवस आधी तयारी करत होतो. घरी काही पदार्थ बनवून बरोबर घेतले, म्हणजे कुठे खाण्याचा प्रश्न येणार नाही. शुक्रवारी(२४ ऑगस्ट, २००१) संध्याकाळी सहा वाजता रेल्वेने आमचा प्रवास सुरू झाला. रेल्वेने हेलसिंकीवरून तुर्कु ह्या शहराला गेलो. रेल्वेचा प्रवास अडीच तासाचा होता. तुर्कु बंदरावरून स्टॉकहोमला जाणारी बोट नऊ वाजता होती. आमची रेल्वे साडे आठला तुर्कु–बंदराला पोचली. तेथून बंदर इतके जवळ होते की आमची बोट दिसतच होती. मग झपाझप पावले उचलत आम्ही बोटीवर जाऊन दाखल झालो. बोटीवर एकूण अकरा मज़ले होते आणि आमची केबिन सातव्या मज़ल्यावर होती. आम्ही सर्वजण इतक्या लांबच्या पल्याचा बोटीचा प्रवास प्रथमच करत होतो. बरोबर नऊ वाजता बोटीचे इंजिन चालू झाले आणि बोटीला लागलेले जिने बाजूला झाले.

सकाळी साडे पाचला, बोट लवकरच स्टॉकहोमला पोचणार आहे, अशी घोषणा झाली. बोटीच्या इंजिनाच्य आवाजाने रात्री झोप लागत नव्हती, पण नंतर मग केंव्हा लागली ते कळलेच नाही. सकाळी बरोबर साडे सहाला स्टॉकहोमच्या बंदराला आमची बोट लागली. हॉटेलवर पोचून फ्रेश होऊन मग लगेच भटकंतीसाठी बाहेर पडलो.

## ॲक्वेरिया वॉटर म्युझियम

(Aquaria Water Museum - http://www.aquaria.se)

भटकंतीची सुरूवात आम्ही ॲक्वेरिया वॉटर म्युझियमपासून केली. हे म्युझियम छोटे होते. शार्क मासे, रंगबिरंगी छोटे–मोठे मासे, खेकडे, समुद्रातले कोळी, स्टारफ़िश, जेलीफ़िश इत्यादी अनेक विविध समुद्रातले जीव येथे होते. तसेच आम्हाला नविन असे म्हणजे मोहक रंग असलेले छोटे–छोटे बेडूक होते, परंतु ते अत्यंत विषारी असल्याचे तेथील माहिती वाचून समजले.

एका दालनात विषुवत–वृत्तावरच्या प्रदेशातील हवामानासारखे वातावरण निर्माण केले होते. त्या हवामानात असणारी झाडे व प्राणी बघायला ठेवले होते. दालनात प्रवेश केला की ऑटोमॅटिक आवाज चालू व्हायचा. पावसाचा आवाज, वीज़ कडाडल्याचा आवाज़, बेडकाचा आवाज़, असे अनेकविध आवाज़ आल्याने खरोखरच आपण त्या वातावरण गेल्याचे भासले. मला तर मी सिंगापूर मध्ये असल्यासारखे वाटले.

## सायन्स ॲंड टेक्नालॉजी ॲंड टेलीकम्युनिकेशन म्युझियम

(The Museum of Science and Technology, and The Telecommunications Museum - http://www.tekmu.se/english/index.htm)

मग बसने आम्ही सायन्स ॲंड टेक्नालॉजी म्युझियमकडे निघालो. आम्हाला कुठे जायचे ते बस ड्रायव्हरला सांगितले, परंतु त्याने ते कदाचित चुकीचे ऐकले त्यामुळे त्याने आम्हाला आर्ट म्युझियमच्या इथे उतरवले. मग आम्ही परत बसने मागे आलो आणि सायन्स ॲंड टेक्नालॉजी म्युझियमच्या इथे उतरलो.

पहिल्या दालनात भव्य मशिनरी हॉल होता. तिथे वाफ़ेवर चालणारे एक भले मोठ्ठे इंजिन ठेवले होते. तसेच वाफ़ेवर चालणारी इतर अनेक मशिन्स ठेवली होती. सर्वात पहिली सायकल, मग काळानुसार सायकलीच्या

मॉडेल्समध्ये कसे बदल होत गेले, हे दर्शविले होते. बायकांसाठी तयार केलेले पूर्वीचे सायकलीचे मॉडेल बघण्यासारखे होते. तसेच, साब आणि वोल्व्हो ह्या स्विडिश कंपन्यांचे गाडयांची विविध मॉडेल्स पण ठेवली होती. स्कॅनिया ही स्विडिश कंपनी ट्रक आणि प्रवासी बसेस बनवण्यासाठी जगप्रसिध्द आहे.

दुसऱ्या दालनाकडे जाणारा रस्ता फ़ार छोटा होता व तिथे अंधार जास्त होता. कारण ह्या दालनात खाण कशी असते हे दाखवण्यात आले होते. धातुच्या खाणीचा हुबेहुब देखावा केला होता. ह्या खाणीच्या दालनात शिरताना आपोआपच खाणीत जसा आवाज निघतो, तसा येतो. मग आपल्याला खरोखरच खाणीत शिरल्याचा भास होतो. खाणीत खोदकाम कसे करतात, सापडलेले अशुध्द धातुंची ने-आण कशी करतात इत्यादी दाखवण्यात आले होते. सोने, चांदी, तांबे, लोह हे धातु खाणीत सापडलेले की ते ज्या अशुध्द अवस्थेमध्ये असतात, तशाच अवस्थेमध्ये ठेवलेले होते. खाणीच्या उद्योगामध्ये लागणाऱ्या मशिनरी व वाहने बनविण्यामध्ये स्वीडन हा देश अग्रेसर आहे.

तिसऱ्या दालनात अत्याधुनिक वस्तु ठेवल्या होत्या. स्वीडन हा देश इतर क्षेत्रांमध्ये पण फ़ार प्रगत आहे. उदाहरणार्थ, वैद्यकिय ऑपरेशनमध्ये लागणारी सामुग्री, दंतवैद्याला लागणारे सामान, मोबाईल फ़ोन इत्यादी वस्तु ठेवण्यात आल्या होत्या. एका ठिकाणी, ऑपरेशन झाल्यावर टाके घालण्यासाठी वापरली जाणारी सर्वात सूक्ष्म सुई ठेवली होती, जी आपण एका भिंगाच्या साह्याने बघायची. इतकी सूक्ष्म सुई कशी बनवली असेल, हा प्रश्न मनात घेऊन आम्ही शेवटच्या दालनात प्रवेश केला.

शेवटचे दालन फ़ार मजेशीर होते. ह्या दालनात शास्त्रीय प्रयोगादाखल बनवलेल्या वस्तु तुम्ही प्रत्यक्ष हाताळू शकता, या चालवून बघू शकता. अशाच एका खोलीमध्ये, तुम्ही एका काटयावर उभे राहून आपल्या आकाशगंगेतील विविध ग्रहांवर आपले वजन काय असेल, हे बघू शकता. गुरू ग्रहावर वजन जास्त होते तर मंगळ ग्रहावर वजन कमी भरत होते. तसेच, एका ठिकाणी सर्वात जुना कॅमेरा ठेवला होता, ज्याने तुम्ही फ़ोटो घेऊ शकता. हा जुना कॅमेरा फ़ार मजेशीर होता.

टेलीकम्युनिकेशन म्युझियम पण तितकेच मजेशीर होते. इथे जुन्या काळी वापरली जाणारी संपर्काची विविध साधने ठेवली होती. सर्वात जुना फ़ोन, जुने तार पाठवायचे मशीन, जुना रेडिओ, जुना टी.व्ही ह्या वस्तु बघताना फ़ार मजा वाटत होती. मग ह्या विविध वस्तुंमध्ये काळानुसार कसे बदल होत गेले, काय-काय सुधारणा केल्या गेल्या, ही चित्ररूप माहिती फ़ार अभ्यासपूर्ण होती.

# स्टॉकहोमची ट्रीप (पुढे चालू ....)

रविवार – २६ ऑगस्ट, २००१

## रॉयल पॅलेस म्युझियम

(Royal Palace Museum - http://www.royalcourt.se/eng/index.html)

स्वीडनमध्ये पूर्वी राजेशाही होती आणि आता जरी हा देश लोकतांत्रिक असला तरी अजूनही स्वीडनमध्ये राजा–राणी व राजकुमार–राजकुमारी आहेत आणि ते तेवढ्याच थाटामाटात रहात आहेत. आज आम्ही पूर्वीच्या राजाचा महाल, म्हणजे रॉयल पॅलेस बघायला गेलो होतो. हा रॉयल पॅलेस इतका मोठ्ठा होता की तो बघायला तीन तास लागणार होते. ह्या रॉयल पॅलेसमध्ये कुठेही फ़ोटो काढायला बंदी होती. ह्या रॉयल पॅलेसमध्ये खालील चार गोष्टी बघण्यासारख्या होत्या:

- ट्रेझरी
- स्टेट अपार्टमेंटस
- ट्रे क्रोनोर म्युझियम
- पुरातन वस्तुंचे म्युझियम

## ट्रेझरी

रॉयल पॅलेस पहायला सुरुवात आम्ही ट्रेझरी पासून सुरू केली. ट्रेझरी म्हणजे तिजोरी आणि राजाची तिजोरी भव्य व मालदार असणार. तशीच होती ही ट्रेझरी. राजा–राणीचा मुकुट, राजकुमार–राजकुमारीचे मुकुट, त्यांच्या तलवारी, दागिने अलंकार इत्यादी मौल्यवान वस्तु फ़ारच मोहक होत्या. आणि ह्या सर्व वस्तु सोन्याच्या असुन  हिऱ्या–मोतींनी जडवलेल्या होत्या. हया दालनात उजेड कमी ठेवला होता व काचेत बंदीस्त ठेवलेल्या ह्या वस्तुंवरच फ़क्त प्रकाशझोत (Focus Lights) टाकले होते, त्यामुळे हिरे–माणकांच्या चकाकण्यामुळे सर्व दालनात प्रकाश पडला होता. एकंदरीत ह्या तिजोरीवरून त्या राजाच्या श्रीमंतीची कल्पना आली.

## स्टेट अपार्टमेंटस

ट्रेझरी नंतर आम्ही स्टेट अपार्टमेंटसमध्ये प्रवेश केला. स्टेट अपार्टमेंटस म्हणजे रॉयल पॅलेसमधील विविध खोल्या. प्रत्येक खोली म्हणजे उत्कृष्ट कलाकृतीचा एक नमुनाच होता. कारण प्रत्येक खोलीत, भिंतीवर काढलेले नक्षीकाम, मोठ्ठ–मोठ्ठाली चित्रे, विविध प्रकारची घडयाळे, बारीक कोरीव काम केलेले लाकडी फ़र्निचर, अनेक प्रकारची घडयाळे इत्यादी कलेचे नमुनेच होते. तसेच, राजाची अभ्यासाची खोली, जेवायची खोली, झोपायची खोली, दिवाणखाना, राणीची मेकअप रूम, राजाच्या सेक्रेटरीची खोली – ही सर्व दालने बघून आम्ही थक्क झालो होतो. राजेशाही थाट–माट, श्रीमंती काय असते, हे आत्तापर्यंत नुसते गोष्टीच्या पुस्तकात वाचले होते. परंतु आज प्रत्यक्ष पाहुन त्या राजेशाही थाटची व श्रीमंतीची कल्पना आली.

## ट्रे क्रोनोर म्युझियम

ट्रे क्रोनोर म्हणजे तीन मुकुट (Three Crowns). ट्रे क्रोनोर किल्ला (Tre Kronor Castle) हा १५ ते १६ व्या शतकातील आहे. सन १६९७ साली ह्या किल्ल्याला मोठ्ठी आग लागली होती. त्या आगीत ह्या किल्ल्याचे फ़ार नुकसान झाले, बऱ्याच गोष्टी जळून खाक झाल्या, भारी-भारी वस्तुंचे नुकसान झाले. मग परत ह्या किल्ल्याची दुरूस्ती, डागडुजी करण्यात आली. ह्या किल्ल्याला आग कशी लागली, कुठून आग सुरू झाली, मग ती कशी पसरली, ह्या बद्दल एक फ़िल्म तिथे दाखवली गेली.

ह्या म्युझियम मध्ये खूप जुन्या म्हणजे १२-१३ शतकातल्या वस्तु पण ठेवल्या होत्या. एका ठिकाणी पुर्वीच्या काळची (म्हणजे १२-१३ शतकातील) मासांहारी डिश खाऊन उरलेल्या हाडांचे तुकडे ठेवले होते. ह्या हाडांच्या तुकडयावरून त्या वेळेच्या माणसांच्या खाण्याच्या सवयी, अन्न बनविण्याच्या पध्दतीची कल्पना येत होती. तसेच अन्न कसे साठवून ठेवले जायचे, ते गोदामातून कसे बाहेर काढले जायचे, हे सुध्दा येथे देखाव्याच्या स्वरूपात प्रदर्शित केले होते.

## पुरातन वस्तुंचे म्युझियम

म्युझियमच्या ह्या भागामध्ये अत्यंत पुरातन वस्तु, संगमरवरी पुतळे व वस्तु अशा अनेक गोष्टी ठेवण्यात आल्या होत्या. रॉयल पॅलेसच्या विविध दालनात हे संगमरवरी पुतळे ठेवले जायचे. संगमरवराच्या वस्तु, म्हणजे उदाहरणार्थ - बागेत बसायचा बाक, कारंजे, फ़ायरप्लेस इत्यादी, ह्या प्रत्येक गोष्टी एक-एक सुंदर कलाकृती होत्या.

अशाप्रकारचे कितीतरी रॉयल पॅलेस स्वीडनमध्ये अजूनही आहेत. राजघराण्यातील सध्याच्या पिढीतील मंडळी स्टॉकहोम शहराच्या बाहेर प्रशस्त निवासात थाटामाटात राहतात.

## फ़ुलपाखरांचे म्युझियम

(Butterfly Museum - http://www.fjarilshuset.se/welcome-e.htm)

एक वेगळाच अनुभव घेण्यासाठी मग आम्ही फ़ुलपाखरांचे म्युझियम बघायला गेलो. हे म्युझियम स्टॉकहोम शहरापासून दूर होते. रॉयल हागा पार्क (Royal Haga Park) मध्ये हे म्युझियम होते. ही पार्क पूर्वीच्या राजाची असून फ़ारच मोठ्ठी होती. फ़ुलपाखरांचे म्युझियम ४-५ ग्रीनहाऊसेस मध्ये बनवले होते,

फ़ुलपाखरांसाठी विशिष्ठ तापमान लागते. विशिष्ठ हवामानातच त्यांची पैदास होते. विविध रंगाची, चित्रविचित्र डिझाईन्सची अनेक फ़ुलपाखरे खूपच मोहक होती. कुठले फ़ुलपाखरू जर आवडले तर मी कॅमेराची लेन्स अॅडजस्ट करून फ़ोटोसाठी क्लिक करणार तेवढ्यात ती उडून पण जायची. तरीसुध्दा तीन-चार प्रकारची फ़ुलपाखरे मी माझ्या कॅमेरात टिपून ठेवण्यात यशस्वी झालो. ही सर्व फ़ुलपाखरे बघत असताना एक जम्बो साईज़चे फ़ुलपाखरू माझ्या पॅंटवर येऊन बसले होते. ते जेंव्हा मला कळाले तेंव्हा त्याचा जम्बो साईज़ पाहून मी घाबरून जोरात ओरडलो. कारण एवढे मोठ्ठे फ़ुलपाखरू मी आत्तापर्यंत कधीच पाहिले नव्हते. मग बाबांनी त्याच्या पंखाना हलकेच पकडून ते जवळच्या झाडावर ठेवले.

म्युझियम बघायला येणाऱ्या पर्यटकांना फुलपाखरे जवळून पहायला मिळावी म्हणून ठिकठिकाणी खोटया फुलांचे गुच्छ करून ठेवले होते. त्यामुळे फुलपाखरे थोडयावेळ का होईना ह्या गुच्छांवर येऊन बसायची आणि मग ती आम्हाला जवळून पहायला मिळायची. फुलपाखरांबरोबरच ह्या म्युझियममध्ये इतर पक्षी ठेवले होते. रंगबिरंगी पोपट, कोंबडे, बदके इत्यादी पक्षी फ़ार छान होते. पोपटांच्या जाळीजवळ आम्ही जेंव्हा गेलो, तेंव्हा मी टिपीकल भारतीय शिट्टी वाजवली. तर खरोखरच ते पोपट आमच्या जवळ आले. एक जवळ आलेला पोपट तर असा होता की, तो आपल्याला त्याच्या डोक्याला हात लावून द्यायचा. त्याला डोक्यावरून हात फ़िरवलेले खूप आवडायचे. परंतु इतर परदेशी पर्यटक पोपटांसाठी शिट्टी वाजवत नव्हते. शिट्टी वाजवल्यावर पोपट आपल्या जवळ येतो, हे कदाचित त्यांना माहीत नसावे.

एकंदरीत इस्टोनियाचे तुलनेत स्टॉकहोम आम्हांसर्वांना खूप आवडले. भाषेचा कुठेही प्रश्न आला नाही, कारण बहुतेक सर्वांनाच इंग्रजी भाषा येत होती. अगदी बस ड्रायव्हर सुध्दा आम्ही कुठे उतरायचे हे इंग्रजीतून सांगत होता. तसेच, रस्त्यात जरी कुणाला विचारले तरी ते पत्ता व आवश्यक ती माहिती हसतमुखाने सांगत होते. स्टॉकहोम शहर खूप जुने आणि मोठ्ठे आहे, त्यामुळे तेथे बघण्यासारख्या गोष्टी खूप आहेत. प्रत्येक जुनी इमारत वास्तुशिल्पाच्या कलेतील एक उत्तम नमुना आहे.

# ऑलँडची ट्रीप

२७ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट, २००१

(Åland – http://www.goaland.net/index.asp?lang=en)

ऑलँड हे फ़िनलँड आणि स्टॉकहोम ह्या दोन देशांच्यामध्ये असलेले छोटे बेट असून, ते फ़िनलँडच्या मालकीचे आहे. २७ ऑगस्टला रात्री ८ वाजून दहा मिनिटांनी आमची ऑलँडची बोट होती. ही बोट भल्या पहाटे साडे तीन वाजता ऑलँडला पोचणार होती. बोट ऑलँडला फ़क्त पाच ते दहा मिनिटे थांबणार होती. त्यामुळे आम्हाला रात्रभर झोप नव्हती. बोट ठरलेल्या वेळेला बरोबर ऑलँडला पोचली. मग आम्ही टॅक्सीने हॉटेलवर जाऊन सकाळी उशीरापर्यंत आराम केला.

ऑलँडमध्ये ज्यादिवशी उतरलो त्यादिवशी अधून-मधून सारखा पाऊस पडत होता, गार वारे वाहत होते. ११-१२ च्या दरम्यान पाऊस थांबला आणि मग आम्ही लगेच हॉटेलच्या जवळच असलेले मारीटाईम म्युझियम बघायला गेलो.

## मारीटाईम म्युझियम

२८ ऑगस्ट, २००१

(Åland Maritime Museum – http://www.maritime-museum.aland.fi/index_eng.html)

मारीटाईम म्युझियम म्हणजे जहाज-नौका व समुद्राबद्दलचे म्युझियम. ह्या म्युझियममध्ये बोटीवरचे, समुद्रावरचे जीवन कसे असते, हे संग्रही केलेल्या वस्तुंच्या आधारे दाखवले होते. विविध प्रकारच्या विविध काळातील बोटींचे मॉडेल्स येथे होती. बोटीतील बारीक-सारीक गोष्टी लक्षात घेऊन बनवलेली ही बोटींची मॉडेल्स खूप छान होती. तसेच, पूर्वी बोटींचे पुढचे टोक खूप आकर्षक असायचे. ह्या पुढच्या टोकावर लाकडावर कोरीवकाम केलेली विविध प्रकारची डिझाईन्स असायची. अशाप्रकारची आकर्षक डिझाईन्स असलेली बोटींची पुढील टोके येथे प्रदर्शित करण्यात आली होती.

बोटीवर वापरली जाणारी विविध साधने, उदाहरणार्थ होकायंत्र, दुर्बिण, वाळूची घडयाळे, स्वसंरक्षणासाठी वापरली जाणारी आयुधे इत्यादी गोष्टी पण येथे सविस्तर माहिती सकट ठेवण्यात आली होती. तसेच, पूर्वी बोटींवर वापरल्या जाणाऱ्या दोरखंडाच्या गाठी अनेक नानाविध प्रकारे बांधल्या जायच्या. ती एक प्रकारची कलाच होती. अशाप्रकारे तयार केलेल्या आकर्षक गाठी येथे होत्या. ही आगळी-वेगळी गाठी बांधण्याची कला शिकून घ्यायची इच्छा आम्हांसर्वांच्या मनात आल्यावाचून राहिली नाही.

म्युझियमचा शेवटच्या भागात, एक भली मोठ्ठी पुरातन मालवाहू बोट प्रदर्शनास ठेवण्यात आली होती. ही बोट समुद्रात लंगर टाकून म्युझियमच्या जवळ उभी केली होती. ह्या बोटीचे नाव पोम्मेर्न (Pommern) असे होते आणि सन १९५२ पर्यंत ही बोट वापरात होती. मग नंतर ही बोट वापरली गेली नाही. प्रत्यक्षात बोटीत शिरून ही पुरातन बोट पाहण्याचा अनुभव काही औरच होता. बोटीला तीन मजले होते. खालचे दोन मजले गोदामाचे होते आणि त्यात माल साठवला जायचा. ह्या गोदामात माल कसा ठेवला जायचा, तो बाहेर कसा काढला जायचा, हे इथे दाखवण्यात आले होते.

# पुरातन चर्च

२९ ऑगस्ट, २००१

आज दुपारी १२ पर्यंतच मुक्काम असल्याने, आम्ही सकाळी बाजारात फ़िरायला गेलो. परत येताना वाटेत जवळ–जवळ शंभर–सव्वाशे वर्षापूर्वीचे चर्च बघितले. चर्चमध्ये जाऊन येशू पुढे कॅंडल(म्हणजे मेणबत्ती) लावून प्रार्थना पण केली, खूप शांत वाटले.

दुपारी अडीच वाजता फ़िनलॅंडकडे परतणारी आमची बोट होती. आम्ही सगळे इतके दिवस सतत प्रवास करून थकलो होतो, त्यामुळे कधी एकदा घरी जाऊन शुध्द भारतीय जेवण आराम करतोय असे झाले होते. घरी परतायला रात्रीचे साडे बारा झाले.

अविस्मरणीय अशी ही ट्रीप, आमच्या कॅमेरात आणि स्मृतीत कायम घर करून राहिली आहे.

# श्री सत्यनारायणाची पूजा

आई–बाबा फ़िनलँडमध्ये असताना अधिक मास होता. त्यानिमित्ताने आम्ही शनिवार दिनांक २२ सप्टेंबर, २००१ रोजी, येथील घरी श्री सत्यनारायणाची पूजा आयोजित केली होती. भारतातून येताना आई–बाबांनी पूजेचे साहित्य बरोबर आणले होते. कारण आख्खे बदाम, खारीक, हळकुंड, सुपारी, गुलाल, बुक्का इत्यादी सामान फ़िनलँडमध्ये मिळणे मुश्किल आहे.

सकाळी पूजा करायचे ठरले होते. केळीचे खुंट काही मिळाले नाहीत. मग आम्ही जवळून फ़ुले आणायचे ठरवले. फ़िनलँडमधील उन्हाळा संपत आल्याने फ़ुले पण मिळतील का नाही ही शंका मनात होती. परंतु, सुदैवाने आम्हाला घराच्याजवळच पूजेला पुरेशी फ़ुले मिळाली. आईला पूजा कशी करायची ते माहीत होतेच, तरी पण आम्ही सत्यनारायणाच्या पूजेची कॅसेट लावली आणि त्याप्रमाणे रीतसर पूजा केली.

संध्याकाळी साडेचारच्या पुढे, आम्ही आमच्या फ़िनलँडमधील मित्रमंडळींना घरी तीर्थप्रसादाला बोलवले होते. तसेच आमचे शेजारील एका वयोवृध्द फ़िनिश जोडप्याला पण बोलवले होते. त्यांनी ह्या समारंभाचे सर्वाधिक फ़ोटो काढले, कारण त्यांना हे सर्व नवीन होते. तीर्थप्रसादाबरोबरच आम्ही काही पदार्थ केले होते. मसालेभात, गुलाबजाम, पॅटीस, पुरणपोळी, गाजरहलवा, ऑरेंज–ज्युस इत्यादी विविध असा मेनू केला होता. आमचे शेजारी फ़िनिश जोडप्याला मसालेभात व पुरणपोळी खूपच आवडली.

परदेशातील अशी ही माझी पहिलीच सत्यनारायणाची पूजा होती. ही पूजा आणि सर्व समारंभ खूप चांगला झाला. घरात खूप छान असे मांगलिक वातावरण झाले होते. अधिक मासाबरोबरच, ही पूजा घालण्याचे दुसरे कारण असे की, नुकतेच अमेरिकेवर अतिरेकी हल्ले होऊन युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. जगात युध्द होऊ नये व सगळीकडे शांतता प्रस्थापित व्हावी, हा मनोदय पण ह्या सत्यनारायणाची पूजा करण्यामागे होता.

# मजेशीर किस्से व चुटकुले

प्रवासवर्णानाच्या ह्या भागात घडलेले मजेशीर किस्से लिहित आहे.

आई नेहमी साडी किंवा पंजाबी ड्रेस अशा भारतीय वेषात फ़िरत असल्याने, बरीच फ़िनिश लोकं तिच्याकडे सारखी बघायची. त्यामुळे आईला आपण बॉलिवूडची एखादी हिरोईन झाल्यासारखे वाटत होते. एकदा बसमधून जात असताना एका फ़िनिश माणसाने आमच्याकडे पाहिले. हा माणूस जरा विक्षिप्तपणे वागत होता. त्याचा स्टॉप आल्यावर, बसमधून उतरायच्या आधी त्याने आमच्याकडे बघितले आणि इंडिया, बांगलादेश अँड फ़िनलँड असे जोरात ओरडून आम्हाला सलाम ठोकला. बांगलादेश अशासाठी की, तन्वी व माझ्याकडे बघून त्याला आम्ही दोघे बांगलादेशी आहोत, असे वाटले. आम्हाला धक्काच बसला व बसमधील सर्व प्रवासी आमच्याकडे बघत होते.

आई–बाबांना फ़िनलँडमध्ये अतिजाड आणि स्थूल माणसे खूप आहेत, असे दिसले. काही माणसे इतकी जाड होती की, ती इतकी जाड कशी झाली, यांचे आता पुढे कसे होणार? – असे यक्षप्रश्न आमच्या सगळ्यांच्या मनात यायचे. एकदा आईला बसमध्ये चढताना अशक्य जाड असा बस ड्रायव्हर दिसला. त्याला बसचा पास दाखवताना आईला हसू काही आवरत नव्हते. बसमध्ये बसलेली अशीच एक जाड बाई पाहून, बाबा म्हणाले की वजनावर बसचे तिकिट ठेवायला पाहिजे. आम्हांसर्वांना इतके हसू आवरले की, ती जाड बाई सारखी आमच्याकडे रागाने बघत होती. पण आम्ही मात्र खदाखदा हसत होतो.

एक–दोनदा आईने घरी ढोकळा आणि हिरव्या मिरच्यांचा ठेचा केला होता. ढोकळ्याबरोबर, सर्वांनाच हिरव्या मिरच्यांचा झणझणीत असा ठेचा खूप आवडला. हा ठेचा आणि ढोकळा मी माझ्या ऑफ़िसमधील फ़िनिश बॉस व सहकारी मित्रांना पण दिला होता. त्यांनादेखील हे दोन्ही पदार्थ खूप आवडले. तसेच हे दोन्ही पदार्थ कसे करायचे, याची पाककृती पण त्यांनी माझ्याकडून आवर्जून लिहून घेतली.